**जाणीव रुग्णालय (सोबत फाउंडेशन चंद्रपूर)**
**मु. पो. गेवरा बूज, तालुका सावली, जिल्हा चंद्रपूर, महाराष्ट्र-४४१२१५**

# वार्षिक अहवाल

## जानेवारी २०२४ - मार्च २०२५



## मनोगत

प्रिय वाचक,

नमस्कार.

आम्ही जाणीव रुग्णालयाचा वार्षिक अहवाल आपल्या समोर सादर करत आहोत. या अहवालाच्या माध्यमातून, वर्षभरात रुग्णालयाने राबवलेल्या विविध उपक्रमांची माहिती आपणास देण्यात येत आहे.

गेल्या वर्षभरात जाणीव रुग्णालयाने आरोग्यविषयक उपक्रम, मोफत तपासणी शिबिरे, रोगप्रतिबंधक उपाययोजना, तसेच जनजागृती कार्यक्रम प्रभावीपणे राबवले. रुग्णसेवेची गुणवत्ता वाढवण्यासाठी अत्याधुनिक उपचार सुविधा, प्रशिक्षित आरोग्य कर्मचारी आणि सेवा विस्तार यावर विशेष भर देण्यात आला.

आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळे आम्ही गेवरा बूज येथे गेली पाच वर्षे अखंड आरोग्य सेवा पुरवित आहोत. हा प्रवास सहज नव्हता, पण आपल्या प्रेम, पाठिंबा आणि विश्वासामुळेच आम्ही ही सेवा निष्ठेने सुरू ठेवू शकलो. जाणीव रुग्णालय केवळ एक उपचार केंद्र नसून, परिसरातील प्रत्येक व्यक्तीच्या उत्तम आरोग्यासाठी कटिबद्ध असलेली एक सामाजिक जबाबदारी आहे.

आपल्या सातत्यपूर्ण सहकार्यामुळे सोबत फाउंडेशन अधिक सक्षम बनत आहे. आम्ही आपले मनःपूर्वक आभार मानतो. भविष्यकाळातही आपले प्रेम, विश्वास आणि साथ मिळावी, हीच नम्र विनंती.

धन्यवाद.

डॉ. सूरज म्हस्के (संचालक)
डॉ. रोहित गणोरकर (संचालक)
डॉ. जानकी गुरपुडे (संचालक)
जाणीव रुग्णालय, गेवरा बूज,
सोबत फाउंडेशन चंद्रपूर.




# अनुक्रमणिका


| | शीर्षक | पान क्र. |
|---|---|---|
| १ | सोबत फाउंडेशन संचालक मंडळ | १ |
| २ | जाणीव रुग्णालय टीम सदस्य | २ |
| ३ | सोबत फाउंडेशनची स्थापना: गरज आणि उद्दिष्टे | ३ |
| ४ | बाह्यरुग्ण विभाग | ४-७ |
| ५ | दंतरोग विभाग | ८-९ |
| ६ | जाणीव रुग्णालयात आंतररुग्ण विभाग सुरु | १० |
| ७ | नेत्रतपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर | ११ |
| ८ | आरोग्य तपासणी शिबीर - १) मानसिक आरोग्य २) कान-नाक-घसा, बालरोग ३) उच्चरक्तदाब, मधुमेह व दंत चिकित्सा | १२ |
| ९ | चला स्वत:ला समजून घेऊया | १३ |
| १० | आरोग्य सोबतीची निवड. गरोदर महिला, स्तनदा माता व लहान मुलांसाठी उपचार केंद्र | १४ |
| ११ | आवळगाव येथे आरोग्य उपकेंद्राची सुरूवात | १५ |
| १२ | करिअर मार्गदर्शन शिबीर | १६ |
| १३ | मान्यवर व्यक्तींची जाणीव रुग्णालयास भेट | १७ |
| १४ | वार्षिक आढावा, उपजीविकेसाठी फळझाडे आणि गरजूंसाठी मदत | १८ |
| १५ | क्रीडा महोत्सव | १९ |
| १६ | सांस्कृतिक महोत्सव | २० |
| १७ | सामाजिक संस्थांना भेट | २१ |
| १८ | लोकबिरादरी प्रकल्प व शहीद हॉस्पिटल क्षेत्रभेट | २२ |
| १९ | ओंकार व प्रशील या तरुण स्वयंसेवकांचे प्रेरणादायी योगदान | २३ |
| २० | संस्थेस प्राप्त निधी व मदतीचा आढावा | २४-२८ |

# सोबत फाउंडेशन चंद्रपूर संचालक मंडळ



डॉ. सुरज राजेंद्र म्हस्के

अध्यक्ष



प्रा. रीना प्रमोद दाजगाये

उपाध्यक्ष



डॉ. जानकी दिगंबर गुरपुडे

सचिव



डॉ. रोहित रामेश्वर गणोरकर

कोषाध्यक्ष



डॉ. हर्षा वसंतराव नन्नावरे

सदस्य



सौ. रश्मी प्रवीण सायरे

सदस्य



डॉ. सौरभ रवींद्र धोपटे

सदस्य



## जाणीव रुग्णालय टीम सदस्य


**स्थानिक भाषेत संवाद करणाऱ्या कार्यकर्त्यांमुळे रुग्णांमध्ये विश्वास निर्माण झाला.**

जाणीव रुग्णालयातील कार्यकर्त्यांनी गावकऱ्यांमध्ये विश्वासाचं नातं निर्माण केलं आहे. स्थानिक भाषेत संवाद साधणारे हे कार्यकर्ते रुग्णांशी मनापासून बोलतात, त्यांच्या अडचणी समजून घेतात आणि योग्य उपचार देतात. विजेच्या समस्येमुळे आणि मर्यादित साधनांमुळे अडचणी आल्या तरीही रुग्णसेवा कधीही थांबलेली नाही. सेवा आणि समर्पणाच्या बळावर रुग्णालय गावकऱ्यांसाठी खरंच 'आपले' बनलं आहे.

सध्या रुग्णालयात एकूण तेरा पूर्णवेळ कार्यकर्ते मनापासून काम करत आहेत. त्यांना साथ देण्यासाठी गावपातळीवर पाच स्वयंसेवक कार्यरत आहेत, तसेच दोन विषयतज्ञ ठराविक वेळ संस्थेसाठी देतात. प्रत्येकाचा सहभाग हीच रुग्णालयाची खरी ताकद आहे.



| | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | डॉ. सुरज म्हस्के | मुख्य वैद्यकीय अधिकारी |
| २ | डॉ. जानकी गुरपुडे | दंतरोग तज्ञ |
| ३ | राहुल शहा मडावी | प्रकल्प समन्वयक |
| ४ | गुरुदेव शेंडे | कार्यालय प्रभारी |
| ५ | श्रेयस गणोरकर | फार्मासिस्ट |
| ६ | आचल कोट्टलवर | कार्यालयीन सहाय्यक |
| ७ | प्रतीक्षा जेंगठे | प्रयोगशाळा तंत्रज्ञ |
| ८ | सुनिता नगारे | सहाय्यक परिचारिका |
| ९ | अश्विनी मारभते | सहाय्यक परिचारिका |
| १० | रोहंता चौधरी | सहाय्यक परिचारिका |
| ११ | शिल्पा पाल | सहाय्यक परिचारिका |
| १२ | रीना शेंडे | सहाय्यक प्रयोगशाळा तंत्रज्ञ |
| १३ | प्रियंका चौधरी | आरोग्य सोबती |
| १४ | गीता चौधरी | आरोग्य सोबती |
| १५ | गायत्री मलोडे | आरोग्य सोबती |
| १६ | विश्वजीत मोटघरे | आरोग्य सोबती |
| १७ | तुषार डोंबले | आरोग्य सोबती |
| १८ | अनिता मारभते | मदतनीस |
| १९ | सी.ए. सारीका कुरनुरकर | कन्सल्टंट |
| २० | ऋतगंधा देशमुख | कन्सल्टंट |




# सोबत फाउंडेशनची स्थापना: गरज आणि उद्दिष्टे

### सोबत फाउंडेशन आणि जाणीव रुग्णालयाचा सामाजिक आरोग्य प्रवास

डॉ. सुरज म्हस्के व डॉ. रोहित गणोरकर यांनी 'सोबत फाउंडेशन' संस्थेची स्थापना दि. २९ नोव्हेंबर २०२० रोजी केली. संपूर्ण आरोग्याचे ध्येय ठेवत प्रामुख्याने आरोग्य, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी यावर काम करण्याचे उद्दिष्ट संस्थेच्या माध्यमातून ठेवण्यात आले. संस्थेच्या माध्यमातून जाणीव रुग्णालय, गाव गेवरा बूज, तालुका सावली, जिल्हा चंद्रपूर येथे सुरु करण्यात आले.


गेवरा बूज हे १,४०० लोकवस्तीचे गाव वैनगंगेच्या पश्चिम तीरावर वसलेले असून सावली-ब्रम्हपुरी वनपरीक्षेत्रात येते. धान पिकावर प्रामुख्याने अवलंबून असणारे इथले लोक खरीप हंगामानंतर बहुतांशी काळ रोजगारासाठी महाराष्ट्राच्या इतर जिल्ह्यात तसेच शेजारील राज्यात जात असतात. तालुक्यातील दोन प्राथमिक आरोग्य केंद्र वगळता सभोवतालच्या ७० गावात आरोग्य सेवेचे दुसरे केंद्र नाही. लोक औषध उपचारांसाठी प्रामुख्याने वैदू तसेच बोगस डॉक्टरांकडे जातात. जिल्ह्याचे ठिकाण ११० किमी लांब असून तालुक्याच्या ठिकाणीही लांब अंतरामुळे लोक पुढील उपचारासाठी जाण्यास टाळाटाळ करतात.

जाणीव रुग्णालयात शुक्रवार ते बुधवार असे आठवड्याचे सहा दिवस प्रामुख्याने बाह्यरुग्ण-आंतररुग्ण सेवा, ड्रेसिंग, प्रयोगशाळा व्यवस्था, डे-केअर तसेच जेनेरीक औषधांची सेवा उपलब्ध आहे. गुरुवारी रुग्णालयाला सुटी असते.

आपत्कालीन सेवेकरीता डॉक्टर २४ तास गावात पूर्णवेळ उपलब्ध असतात. सद्यस्थिती मध्ये रुग्णालयाची जबाबदारी एकूण २० कार्यकर्ते सांभाळतात.

जानेवारी २०२२ मध्ये दातांचा दवाखाना सुरू करण्यात आला तसेच रुग्णालयात ईसीजीची व्यवस्था करण्यात आली. प्रयोगशाळा सुरू केली तेव्हा किटवर होतील एवढ्याच तपासण्या होत होत्या. जानेवारी २०२२ मध्ये प्रयोगशाळेत सुक्ष्मदर्शक, बायोकेमिस्ट्री मशीन, मायक्रोस्कोप तसेच हिमॅटोलॉजी ऍनालायझर मशीन आले. त्यामुळे योग्य निदान होऊन औषधोपचार करण्यात मदत होत आहे.

संपूर्ण आरोग्य म्हणजे सुधृढ शरीरासोबत सशक्त मन. त्याकरिता दोन वर्षांपासून सांस्कृतिक कार्यक्रम, प्रबोधनात्मक कार्यक्रम तसेच खेळांचे आयोजन करण्यात येत आहे. या पुढे देखील सोबत फाऊंडेशन व जाणीव रुग्णालयाच्या माध्यमातून अधिक भरीव काम सावली तालुक्यात करण्याचा संस्थेचा मानस आहे.




## बाह्यरुग्ण विभाग-

**ग्रामीण आरोग्यसेवेत सातत्य. जाणीव रुग्णालयाची OPD व प्रयोगशाळा सेवा.**

जानेवारी-२४ ते मार्च-२५ या कालावधीत रुग्णालयात एकूण ८,३१२ एवढे रुग्ण आले. एकूण २८८ दिवस बाह्यरुग्ण विभाग सेवा देण्यासाठी सुरु होता.

| | सेवा | पुरुष | स्त्री | लहान मुले | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | बाह्यरुग्ण | २,७६४ | २,९६३ | १,८१८ | ७,५४५ |
| २ | आपत्कालीन | २९८ | २३१ | २३८ | ७६७ |
| ३ | आंतरुग्ण | ७३ | ७९ | २६ | १७८ |
| | एकूण | ३,१३५ | ३,२७३ | २,०८२ | ८,४९० |

खालील सुविधा बाह्यरुग्ण विभागात देण्यात आल्या.

| | सेवा | एकूण |
|---|---|---|
| १ | डे-केअर | २९८ |
| २ | ड्रेसिंग | २८८ |
| ३ | नर्सिंग केअर | ६९१ |
| ४ | इंजेक्शन | ७९८ |
| ५ | प्रयोगशाळा तपासणी | ५,६३० |
| ६ | रुग्णवाहिका सुविधा | १६ |
| ७ | रेफरल | ९४ |
| ८ | ईसीजी सुविधा | १३२ |

पुढील तपासण्या रुग्णालयातील प्रयोगशाळेत करण्यात आल्या.

| | Test name | count | | Test name | count |
|---|---|---|---|---|---|
| 1 | RBS | 230 | 23 | Uric acid | 38 |
| 2 | ESR | 84 | 24 | Urine GK | 8 |
| 3 | HIV | 16 | 25 | Urine Alb | 5 |
| 4 | HDL | 76 | 26 | Urine Alb G P | 19 |
| 5 | UPT | 73 | 27 | Urine sugar | 1 |
| 6 | ALP | 0 | 28 | Urine 10 para | 584 |
| 7 | CBC | 1172 | 29 | Triglyceride | 74 |
| 8 | SGOT | 27 | 30 | Total protein | 8 |
| 9 | SGPT | 27 | 31 | Scrub typhus | 7 |
| 10 | Urea | 27 | 32 | Blood group | 27 |
| 11 | HBsAg | 16 | 33 | Haemoglobin | 424 |
| 12 | VDRL | 8 | 34 | Blood glucose | 846 |
| 13 | Widal | 603 | 35 | Serum albumin | 8 |
| 14 | Lipase | 19 | 36 | Total bilirubin | 53 |
| 15 | Malaria | 534 | 37 | Direct bilirubin | 53 |
| 16 | Dengue | 68 | 38 | Serum creatinine | 168 |
| 17 | Amylase | 19 | 39 | Total cholesterol | 76 |
| 18 | Sodium | 0 | 40 | CRP(Biochemistry) | 150 |
| 19 | Potassium | 0 | 41 | Whole blood clotting | 5 |
| 20 | RA factor | 37 | | Total | 5,630 |
| 21 | MIC urine | 11 | | | |
| 22 | Sickle cell | 29 | | | |

पुढे



# बाह्यरुग्ण विभाग-

एकूण ९८ प्रकारच्या आजारांचे निदान व उपचार करण्यात आले.

<table>
<tr><th></th><th>Disease</th><th>Count</th></tr>
<tr><td>1</td><td>URTI</td><td rowspan="5">2,131</td></tr>
<tr><td>2</td><td>Common cold</td></tr>
<tr><td>3</td><td>Cold</td></tr>
<tr><td>4</td><td>Throat pain</td></tr>
<tr><td>5</td><td>Cough</td></tr>
<tr><td>6</td><td>Fever</td><td rowspan="7">1,484</td></tr>
<tr><td>7</td><td>Malaria</td></tr>
<tr><td>8</td><td>Dengue</td></tr>
<tr><td>9</td><td>Typhoid</td></tr>
<tr><td>10</td><td>Scrub</td></tr>
<tr><td>11</td><td>Corona</td></tr>
<tr><td>12</td><td>Meningitis</td></tr>
<tr><td>13</td><td>Skin Infections-</td><td rowspan="6">829</td></tr>
<tr><td>14</td><td>Scabies</td></tr>
<tr><td>15</td><td>P. Versicolor</td></tr>
<tr><td>16</td><td>Taenia</td></tr>
<tr><td>17</td><td>Eczema</td></tr>
<tr><td>18</td><td>Rash</td></tr>
</table>

<table>
<tr><th></th><th>Disease</th><th>Count</th></tr>
<tr><td>19</td><td>Headache</td><td rowspan="8">318</td></tr>
<tr><td>20</td><td>Migraine</td></tr>
<tr><td>21</td><td>Vision problem</td></tr>
<tr><td>22</td><td>Cataract</td></tr>
<tr><td>23</td><td>Glaucoma</td></tr>
<tr><td>24</td><td>Infection</td></tr>
<tr><td>25</td><td>ASOM</td></tr>
<tr><td>26</td><td>CSOM</td></tr>
<tr><td>27</td><td>Dysmenorrhoea</td><td rowspan="5">44</td></tr>
<tr><td>28</td><td>Irregular menses</td></tr>
<tr><td>29</td><td>White discharge</td></tr>
<tr><td>30</td><td>Menorrhagia</td></tr>
<tr><td>31</td><td>Oligomenorrhoea</td></tr>
<tr><td>32</td><td>Depression</td><td rowspan="7">124</td></tr>
<tr><td>33</td><td>Psychosis</td></tr>
<tr><td>34</td><td>Anxiety</td></tr>
<tr><td>35</td><td>Schizophrenia</td></tr>
<tr><td>36</td><td>Addiction</td></tr>
<tr><td>37</td><td>Insomnia</td></tr>
<tr><td>38</td><td>Vertigo</td></tr>
<tr><td colspan="3" align="right">पुढे</td></tr>
</table>




## बाह्यरुग्ण विभाग-

| | Disease | Count |
|---|---|---|
| 39 | Lacerated wound | 357 |
| 40 | Abrasion | |
| 41 | Fracture | |
| 42 | Displacement | |
| 43 | Dressing | |
| 44 | Limb pain | 1,311 |
| 45 | Headache | |
| 46 | Low back pain | |
| 47 | Chronic LBP | |
| 48 | Joint pain | |
| 49 | Neck pain | |
| 50 | Generalized body ache | |
| 51 | Chronic limb pain | |
| 52 | Knee pain | |
| 53 | Shoulder pain | |
| 54 | Ankle pain | |
| 55 | Bodyache | |
| 56 | Musculoskeletal pain (chest/ other) | |
| 57 | Elephantiasis | 7 |
| 58 | Diabetes mellitus | 311 |
| 59 | Sickle cell disease | 11 |
| 60 | Epilepsy | 4 |


| | Disease | Count |
|---|---|---|
| 61 | Vomiting | 1,574 |
| 62 | Diarrhea without dehydration | |
| 63 | Dysentery | |
| 64 | Haematemesis | |
| 65 | APD | |
| 66 | UTI | |
| 67 | Abdominal pain | |
| 68 | Snakebite | 26 |
| 69 | Scorpion bite | |
| 70 | Dog bite | |
| 71 | Tiger bite | |
| 72 | Insect bite | |
| 73 | Honey bee bite | |
| 74 | HD | 62 |
| 75 | Stroke | |
| 76 | Ischemic heart disease | |
| 77 | Heart failure | |
| 78 | Arrhythmia | |
| 79 | BPHI | |
| 80 | Anemia | 260 |
| 81 | Infertility | 15 |
| | | पुढे |



# बाह्यरुग्ण विभाग

<table>
<tr><th></th><th>Disease</th><th>Patient count</th></tr>
<tr><td>82</td><td>Hernia</td><td rowspan="6">19</td></tr>
<tr><td>83</td><td>Hydrocoe</td></tr>
<tr><td>84</td><td>Appendix</td></tr>
<tr><td>85</td><td>Uterine mass</td></tr>
<tr><td>86</td><td>Breast lump</td></tr>
<tr><td>87</td><td>Muscle mass</td></tr>
<tr><td>88</td><td>Fissure</td><td rowspan="6">7</td></tr>
<tr><td>89</td><td>Haemorrhoid</td></tr>
<tr><td>90</td><td>Fistula</td></tr>
<tr><td>91</td><td>Rectal prolapse, stricture urethra</td></tr>
<tr><td>92</td><td>Hypospadias</td></tr>
<tr><td>93</td><td>Phimosis</td></tr>
<tr><td>94</td><td>Hyperthyroidism</td><td rowspan="2">57</td></tr>
<tr><td>95</td><td>Hypothyroidism</td></tr>
<tr><td>96</td><td>Hypertension</td><td>1,272</td></tr>
<tr><td>97</td><td>Alcoholic liver disease</td><td>33</td></tr>
<tr><td>98</td><td>General check-up</td><td>351</td></tr>
</table>






# दंतरोग विभाग-

**कॅन्सरसंबंधी निदान (CA tongue, Leukoplakia, Erythroplakia, SCC) १२ रुग्ण निदान झाले.**

दंतरोग विभागात एकूण ५९५ एवढे रुग्ण आले, त्यातील १२ रुग्णांना पुढील उपचारासाठी रेफर करण्यात आले. एकूण २२७ दिवस बाह्यरुग्ण विभाग सेवा देण्यासाठी सुरु होता.

| | सेवा | पुरुष | स्त्री | लहान मुले | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | बाह्यरुग्ण | २३९ | २६७ | ७४ | ५८० |
| २ | आपत्कालीन | १ | ० | २ | ३ |
| | एकूण | २४० | २६७ | ७६ | ५८३ |

खालील आजारांचे निदान व उपचार दंतरोग विभागात करण्यात आले. एकूण २४ प्रकारच्या आजारावर निदान करण्यात आले.

| | Disease | Patient count |
|---|---|---|
| 1 | OSMF | 7 |
| 2 | Lipoma | 1 |
| 3 | Errupting | 50 |
| 4 | Mucocele | 3 |
| 5 | Pulp polyp | 1 |
| 6 | Tonsillitis | 0 |
| 7 | Gingivitis | 42 |
| 8 | CA tongue | 1 |
| 9 | Leukoplakia | 3 |
| 10 | TMJ arthritis | 16 |
| 11 | Erythroplakia | 2 |
| | | पुढे |

खालील प्रकारच्या तपासण्या रुग्णालयातील प्रयोगशाळेत करण्यात आल्या.

| | Disease | Patient count |
|---|---|---|
| 12 | Aphthous ulcer | 30 |
| 13 | Radicular cyst | 0 |
| 14 | Accidental fall | 4 |
| 15 | Tooth fracture | 2 |
| 16 | Gingival pocket | 14 |
| 17 | Ugly dickling stage | 1 |
| 18 | Periapical abscess | 0 |
| 19 | Reversible pulpitis | 35 |
| 20 | Irreversible pulpitis | 273 |
| 21 | Trigeminal neuralgia | 10 |
| 22 | Gingival inflammation | 31 |
| 23 | Squamous cell carcinoma | 6 |
| 24 | Primary tooth mobility | 0 |
| 25 | Localised periodontitis | 34 |
| 26 | Generalised periodontitis | 30 |
| 27 | Pericoronitis (impacted) | 11 |
| 28 | Tobacco pouch keratosis | 2 |



# दंतरोग विभाग

खालील प्रकारचे उपचार दंत विभागात करण्यात आले.

| | Treatment | Patient count |
|---|---|---|
| 1 | X-ray | 43 |
| 2 | Tooth extraction | 4 |
| 3 | Root canal treatment | 8 |
| 4 | Scaling | 10 |
| 5 | Prosthesis | 0 |
| 6 | Restoration | 24 |
| 7 | Pediatric procedure | 55 |
| 8 | RCO | 23 |
| 9 | Rounding of cusp | 10 |
| 10 | Temporary restoration | 24 |
| 11 | Irrigation | 11 |
| 12 | Suture given | 1 |
| 13 | Pus Drainage Done | 11 |
| | Total procedure profile | 224 |





# जाणीव रुग्णालयात आंतररुग्ण विभाग सुरु

**लोकांच्या मदतीने आणि एकत्र येऊन हा विभाग तयार झाला.**

दि.२४ जून पासून रुग्णालयात आंतररुग्ण विभाग सुरु करण्यात आला. त्याआधी जागेच्या अभावी रुग्णभरती करणे शक्य नव्हते, त्यामुळे रुग्णांना नेहमी रेफर करावे लागे. गेवरा बूज येथील श्री दादाजी भोयर यांनी मदतीचा हात पुढे केला. त्यांनी वास्तव्य नसलेले घर आंतररुग्ण विभाग सुरु करण्यासाठी दिले. या घराच्या डागडुजीसाठी एकूण अडीच लाख रुपये एवढा खर्च आला. यातील एक लाख रुपये लोकवर्गणीतून उभे राहिले.

आंतररुग्ण विभागाचे उद्घाटन श्री.वासुदेवजी नन्नावरे, श्री मनोहरजी शेंडे आणि सुधीर चौखे यांच्या हस्ते झाले. या तिघा कारागिरांनीच घराच्या डागडुजीचे काम पूर्णत्वास नेले म्हणून यांच्याच हस्ते उदघाट्न केले. जुने, वापरातील साहित्य सुधारून, देणगीतून विभागासाठी लागणाऱ्या सुविधा उभ्या करण्यात आल्या. एकूण १७८ रुग्णांवर या विभागात उपचार करण्यात आले आहेत.





# नेत्रतपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर

**एकूण ३३२ नागरिकांची नेत्र तपासणी. १२६ जणांना माफक दरात चष्मे वाटप. ९५ रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया.**

जाणीव रुग्णालय, गेवरा बूज यांच्या वतीने २०२४-२५ मध्ये दोन गावांमध्ये नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांमुळे स्थानिक तसेच शेजारील गावातील नागरिकांना डोळ्यांची तपासणी, चष्मे व मोतीबिंदू शस्त्रक्रियेचा लाभ मिळाला.

२१ जानेवारी २०२४ रोजी दाबगाव मौशी येथील जिल्हा परिषद शाळेत जाणीव रुग्णालयाच्या वर्षपूर्तीचे औचित्य साधून नेत्र तपासणी शिबिर घेण्यात आले. यामध्ये १०५ नागरिकांनी तपासणी करून घेतली आणि ३० रुग्णांना माफक दरात चष्मे व औषधे देण्यात आली. यानंतर मार्च महिन्यात ४० रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया चंद्रपूर जिल्हा रुग्णालयात करण्यात आली.

१६ ऑक्टोबर २०२४ रोजी गेवरा बूज येथे नेत्र तपासणी शिबिरात ११६ नागरिकांनी सहभाग घेतला. त्यातील ५६ रुग्णांना चष्मे देण्यात आले. पुढे ११ नोव्हेंबर २०२४ रोजी २१ रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी नागपूर येथे पाठवण्यात आले.

६ जानेवारी २०२५ रोजी गेवरा बूज येथील रुग्णालय परिसरात आयोजित शिबिरात १११ रुग्णांनी नेत्र तपासणी करून घेतली. यामध्ये ४८ रुग्ण मोतीबिंदूसाठी पात्र ठरले.

त्यापैकी ३४ रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी नागपूर येथे पाठवण्यात आले, तर इतरांना माफक दरात चष्मे वाटप करण्यात आले. समता फाउंडेशनच्या सहकार्याने ३४ रुग्णांना नागपूर येथे जाण्याची व्यवस्था करण्यात आली. शालिनीताई मेघे वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे या रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली.

या उपक्रमांमुळे अनेक नागरिकांच्या दृष्टीसंबंधित समस्या दूर होण्यास मदत झाली. वृद्ध, शेतकरी, गृहिणी, मजूर, इत्यादींना पुन्हा त्यांच्या नियमित कामात अडथळा न येता काम करता येऊ लागले. गावपातळीवर आरोग्य सेवेसाठी ही शिबिरे महत्त्वाची ठरली.







# आरोग्य तपासणी शिबीर - १) मानसिक आरोग्य २) कान-नाक-घसा, बालरोग ३) उच्चरक्तदाब, मधुमेह व दंत चिकित्सा

**या शिबिरांमुळे ग्रामीण भागातील नागरिकांना गावातच मोफत तपासणी आणि उपचार मिळाले. ज्यांना अधिक उपचारांची गरज होती, त्यांना वेळेवर योग्य ठिकाणी पाठवले गेले.**

परिसरात मानसिक आजाराचे रुग्ण बऱ्याच प्रमाणात आहेत असे आढळून आले. रुग्णालयात मानसिक आजाराचे रुग्ण येत असतात. म्हणून मानसिक आजार निदान व उपचार शिबीर घेण्याचा विचार करण्यात आला. रुग्णालयाच्या वतीने २ मार्च २०२४ ला मानसिक आजार व व्यसन यावर शिबीर आयोजित करण्यात आले होते. हे शिबीर गेवरा बूज व मेहा बूज अशा दोन ठिकाणी घेण्यात आले.

या शिबिरात गावातील व तसेच सिंदेवाही तालुक्यातील लोकांनी तपासणी केली. शिबिरात एकूण १९ रुग्णांनी तपासणी केली. मानसोपचारतज्ञ डॉक्टर आरती बंग (सर्च, गडचिरोली) व त्यांच्या टीमने तज्ज्ञ म्हणून शिबिरात काम पहिले. शिबिरात तपासणी केलेल्या रुग्णांना समुपदेशन व मोफत औषधोपचार करण्यात आले.

जाणीव रुग्णालय गेवरा बुज येथे २ फेब्रुवारीला कान, नाक, घसा व बालरोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बालरोग तज्ञ डॉ. वसंत ढवस यांनी १५ लहान मुलांची, तर डॉ. शिवानी पिदुरकर-ढवस यांनी कान, नाक, घसा विकारांच्या रुग्णांची तपासणी केली.

एकूण ७३ रुग्णांपैकी १० रुग्णांना शस्त्रक्रियेकरीता सर्च रुग्णालय, गडचिरोली येथे दाखल करण्यात आले. शिबिरातील २२ रुग्णांना श्रवण यंत्राची आवश्यकता असल्याचे निदान करण्यात आले.

रुग्णालयाच्या जवळच्या पाच गावात लकवा, उच्च रक्तदाब, मधुमेह, दाताशी निगडीत आजार, व तोंडाचा कर्करोग असे आजार आढळून आले आहेत. या गावात दवाखाना नाही. म्हणून गावातच रोग निदान होऊन उपचार सुरु होण्यासाठी जाणीव रुग्णालयाकडून मोफत तपासणी केली जाते. यामुळे नागरिकांना योग्य व नियमित उपचार रुग्णालयाच्या माध्यमातून मिळत आहेत. ज्या रुग्णांना पुढील उपचारांची गरज आहे त्यांना जाणीव रुग्णालय किंवा इतर रुग्णालयात पाठवले जाते. गावनिहाय आतापर्यंतची रुग्ण तपासणी खालीलप्रमाणे -

| | गाव | एकूण रुग्ण | | गाव | एकूण रुग्ण |
|---|---|---|---|---|---|
| १ | बारसागड | ४९ | ४ | डोंगरगाव | ६३ |
| २ | आकापूर | ४५ | ५ | मेहा बूज | ६७ |
| ३ | बोरमाळा | ४९ | | | |




# चला स्वतःला समजून घेऊया

**या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मभान, जागरूकता आणि सकारात्मक दृष्टीकोन निर्माण झाला.**

जाणीव रुग्णालय सुरु झाल्यापासून किशोरवयीन मुलांसाठी काम करण्याचा टीमचा मानस होता. किशोरवयीन मुलांना मार्गदर्शन म्हणून 'चला स्वतःला समजून घेऊया' हे तीन दिवसीय शिबीर दि. ५ ते ७ फेब्रुवारी दरम्यान नवभारत विद्यालय, अंतरगाव टोला या शाळेत घेण्यात आले. एकूण १५० शालेय मुला-मुलींनी या कार्यक्रमात सहभाग घेतला.

दि. १२ ते १४ डिसेंबर दरम्यान दुसरे शिबीर प्रवीणभाऊ आडेपवार विद्यालय, निफंद्रा येथे घेण्यात आले. इयत्ता ९वी व १०वीचे ११४ मुलं-मुली या शिबिरात उपस्थितीत होते.

या कार्यशाळेत किशोरवयीन मुलामुलींना वयात येताना होणारे शारीरिक व मानसिक बदल, प्रेम, आकर्षण आणि मैत्री यातील फरक समजुन सांगण्यात आला. प्रजनन अवयवांची माहिती व स्वच्छता, मासिक पाळी व तिची योग्य काळजी, स्वप्नदोष व हस्तमैथुनातील समज-गैरसमज, गुप्तरोग आणि एड्सबाबत शास्त्रीय माहिती डॉ. सुरज म्हस्के यांनी दिली.


तसेच तंबाखू, गुटखा, सिगारेट, दारू, गांजा यांसारख्या व्यसनांचे दुष्परिणाम याविषयी देखील प्रोजेक्टरच्या सहाय्याने सविस्तर व सोप्या भाषेत मार्गदर्शन केले.

याशिवाय, विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, संवाद कौशल्य, नातेसंबंध समजून घेणे, आणि चांगली संगत यावर आधारित खेळ व उपक्रमांच्या माध्यमातून माहिती देण्यात आली.

या कार्यक्रमाविषयी सहभागी विद्यार्थ्यांच्या काही बोलक्या प्रतिक्रिया -

- "कधीच असा कार्यक्रम झाला नाही. बरीच माहिती मिळाली."
- "महिला शिक्षिका नाही, मुलींशी या विषयावर संवाद साधला जात नाही."
- "अशा विषयावर आतापर्यंत शाळेत कार्यक्रम झाला नव्हता, स्वतःच्या शरीराबद्दल महत्त्वाची माहिती आम्हाला मिळाली."

असा उपक्रम परिसरातील सर्व शाळांमध्ये घेण्याचा संस्थेचा मानस आहे. हा उपक्रम मोफत राबविल्या जातो.




# आरोग्य सोबतीची निवड. गरोदर महिला, स्तनदा माता व लहान मुलांसाठी उपचार केंद्र

### आरोग्य सेवांचा समावेशक विस्तार

गाव स्तरावर प्राथमिक उपचार आणि मार्गदर्शन केंद्र सुरु करण्यासाठी खालील दहा गावांमध्ये बैठका घेण्यात आल्या. चिखली, बारसागड, मेहा बुज, दाबगाव मौशी, उसरपार चक, खानाबाद, करोली, आकापूर, बोरमाळा आणि डोंगरगाव.

यापैकी बोरमाळा, डोंगरगाव, मेहा बूज, करोली, आकापूर या पाच दुर्गम गावात आरोग्य सोबतीची निवड करून त्यांना प्रशिक्षण देऊन काम सुरु झाले. रुग्णालयाच्या वतीने राबविण्यात येणारे विविध उपक्रम, तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी, रोगनिदान शिबिरे, इत्यादी विषयांची माहिती आरोग्य सोबती मार्फत गावातील लोकांपर्यंत पोहचवण्यात येते.

या पाच गावात मोफत तपासणी क्लिनिक मे-२०२४ पासून सुरु करण्यात आले. दुर्गम भागातील या गावांमध्ये गर्भवती महिला, स्तनदा माता व सहा महिन्यापर्यंतचे लहान मुले यांना वेळेवर आरोग्यसेवा मिळावी याकिरता हा उपक्रम सुरु करण्यात आला. या उपक्रमांतर्गत पुढील गोष्टी केल्या जातात.

- गावात मासिक आरोग्य तपासणी केंद्र सुरू करण्यात आले आहे.
- गर्भवती महिला, स्तनदा माता आणि ६ महिन्यांपर्यंतच्या लहान मुलांची तपासणी केली जाते.
- मोफत औषध आणि उपचार दिले जातात.
- तज्ञ डॉक्टरांकडून मार्गदर्शन मिळते.
- गरज असल्यास गंभीर रुग्णांना गडचिरोली जिल्हा रुग्णालयात पाठवले जाते.

उपचार केंद्रामार्फत आतापर्यंत खालील प्रमाणे एकूण रुग्ण भेटी, तपासणी झाल्या.

| | गाव | गाव भेटी | गरोदर महिला | स्तनदा माता व बालके | लहान मुले (६ महिने -१ वर्ष) |
|---|---|---|---|---|---|
| १ | बोरमाळा | १० | २० | १० | १५ |
| २ | डोंगरगाव | ९ | २५ | १ | ६ |
| ३ | मेहा बूज | ८ | ४० | १६ | ५ |
| ४ | करोली | ५ | १६ | ८ | ३ |
| ५ | आकापूर | ७ | १४ | १२ | ७ |
| | एकूण | ३९ | ११५ | ४७ | ३६ |



# आवळगाव येथे आरोग्य उपकेंद्राची सुरूवात

**लहान-मोठ्या आजारांसाठी तत्काळ वैद्यकीय सल्ला व उपचार मिळणे शक्य झाले आहे.**

दिनांक १ जानेवारी २०२५ पासून जाणीव रुग्णालयाच्या वतीने आवळगाव, तालुका ब्रह्मपुरी, जिल्हा चंद्रपूर येथे आरोग्य उपकेंद्र सुरू करण्यात आले. या उपकेंद्रात आठवड्यातून तीन दिवस बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी) सेवा पुरवण्यात येत आहे. आवळगाव हे ब्रह्मपुरीपासून तीस किलोमीटर आणि सावली तालुक्याच्या गावापासून सुमारे साठ किलोमीटर अंतरावर आहे.

मार्च-२५ पर्यंत झालेल्या एकूण ३१ आरोग्य भेटी आवळगावला देण्यात आल्या. दरम्यान २३८ रुग्णांची तपासणी करण्यात आली. यामध्ये २६ लहान मुले, १०८ महिला आणि १०४ पुरुष रुग्णांचा समावेश होता.

आवळगावची लोकसंख्या अंदाजे चार हजार आहे. या परिसरात एकमेव सरकारी रुग्णालय असून त्याव्यतिरिक्त दुसरा कोणताही दवाखाना नाही. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याच्या समस्या लक्षात घेता, स्थानिक पातळीवर वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी ही तीन दिवसीय ओपीडी सेवा सुरु करण्यात आली आहे. यामुळे गावातील तसेच परिसरातील नागरिकांना त्यांच्या आरोग्याच्या गरजांसाठी दूरच्या प्रवासाची गरज भासणार नाही आणि त्यांना वेळेत उपचार मिळू शकतील.








# करिअर मार्गदर्शन शिबीर

**विद्यार्थ्यांमध्ये करिअरची स्पष्टता निर्माण झाली, शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक झाला.**

गेवरा बूज परिसरातील विद्यार्थ्यांमध्ये दहावी व बारावीनंतर उच्च शिक्षणाबाबत जाणवणारी उदासीनता लक्षात घेऊन सोबत फाउंडेशनच्या वतीने एक विशेष करिअर मार्गदर्शन मेळावा आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून ॲड. दीपक चटप (राजूरा, चंद्रपूर) यांनी उपस्थित राहून मुलांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. ते ब्रिटिश सरकारच्या चेवनिंग स्कॉलरशिपचे सुवर्णपदक विजेते (२०२२-२३) असून, त्यांनी आपल्या अनुभवातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व आणि विविध करिअर पर्याय समजावून सांगितले.

या मार्गदर्शन शिबिरात इयत्ता ९वी ते १२वीचे सुमारे ४५० ते ५०० विद्यार्थी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. परिसरातील खालील पाच शाळांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला:

१. विकास विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय, विहीरगाव
२. प्रवीण भाऊ आडेपवार माध्यमिक विद्यालय, निफन्द्रा
३. जिल्हा माध्यमिक शाळा, निमगाव
४. नवभारत विद्यालय, अंतरगाव
५. इंदिरा गांधी विद्यालय, पालेबरसा

मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांनी विविध शिष्यवृत्ती, स्पर्धा परीक्षा आणि उच्च शिक्षणाच्या संधींबाबत जाणून घेतले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण होऊन, पुढील शिक्षण घेण्यासाठी प्रेरणा मिळाली.





# मान्यवर व्यक्तींची जाणीव रुग्णालयास भेट

**विविध सामाजिक संस्था, डॉक्टर्स आणि कार्यकर्त्यांच्या भेटीमुळे रुग्णालयाच्या कार्याची दखल घेतली गेली.**

जाणीव रुग्णालयास सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या काही मान्यवरांची भेट झाली.

दि. १७ फेब्रुवारी २०२४ रोजी नाशिक जिल्ह्यातील वणी येथील सनय फाउंडेशनच्या सदस्यांनी रुग्णालयाला भेट दिली. या भेटीत श्री. निलेश गायकवाड व त्यांच्या सहकाऱ्यांचा सहभाग होता. त्यांनी संस्थेच्या कार्याची माहिती दिली आणि जाणीव रुग्णालयाच्या कामाची प्रशंसा करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

दि. २५ फेब्रुवारी २०२४ रोजी छत्तीसगडमधील दल्लीराजहरा येथील शहीद रुग्णालयाचे जेष्ठ डॉक्टर डॉ. सैबल जाना आणि डॉ. बिनायक सेन यांनी रुग्णालयास भेट दिली. त्यांनी रुग्णालयाच्या कामाचा आढावा घेत पुढील कामासाठी शुभेच्छा दिल्या.

दि. १० ऑगस्ट २०२४ रोजी मॅजिक फाउंडेशनचे श्री. श्रीकांत एकुडे आणि त्यांच्या टीमने रुग्णालयास भेट दिली. एकुडे सर गाव पुयारदंड, तालुका चिमूर येथे अभ्यासिका चालवतात. त्यांनी रुग्णालयाच्या कार्याची माहिती घेतली व पुढील सहकार्याची तयारी दर्शवली.

चंद्रपूर येथील महिला रोगतज्ज्ञ डॉ. मुंदडा मॅडम यांनी जाणीव रुग्णालयास वेळोवेळी मोलाची मदत केली आहे. त्यांच्या पुढाकाराने गावातील जिल्हा परिषद शाळा व रुग्णालयात पाणी फिल्टर बसविण्यात आले आहेत. त्यांनी रुग्णालयास भेट दिली व येथील कामकाज समजून घेतले.





# वार्षिक आढावा, उपजीविकेसाठी फळझाडे आणि गरजूंसाठी मदत

**कार्यकर्त्यांनी वर्षभर केलेल्या कामाचे सादरीकरण केल्यामुळे सर्वांची जबाबदारी स्पष्ट झाली.**

### वार्षिक आढावा बैठक

दि. २ एप्रिल २०२४ रोजी संस्थेची वर्ष २०२३- २४ या आर्थिक वर्षाची वार्षिक आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीला रुग्णालयात कार्यरत सर्व कार्यकर्ते उपस्थित होते. या बैठकीत वर्षभरात झालेले काम, देण्यात आलेल्या सेवा, कामकाजातील सुधारणा व अडचणी, नवीन जबाबदाऱ्या या विषयावर कार्यकर्त्यांनी चर्चा केली. कार्यकर्त्यांनी आपल्या कामाचे सादरीकरण पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन द्वारे केले. रुग्णालयाच्या पुढच्या वर्षीच्या कामकाजासंबंधी संस्थेच्या अध्यक्षांनी मार्गदर्शन केले.

### गावस्तरावर फळझाडे वाटप

करोली, आकापुर, बोरमाळा, डोंगरगाव आणि मेहा बूज या गावातील एकूण ४८ विधवा महिलांना फळ झाडांचे वाटप करण्यात आले. या फळ झाडांमध्ये आंबा, फणस, पेरू, लिंबू, आवळा यांचा समावेश होता. एकूण १५० झाडांचे वाटप करण्यात आले. या गावांतील पाच आरोग्यसोबती आणि बारा जाणीव रुग्णालयाचे कर्मचारी यांना देखील फळ झाडांचे वाटप करण्यात आले. भविष्यात या झाडांची फळे कुटुंबांना खाण्यासाठी होतील तसेच फळविक्रीतून उत्पन्न मिळेल या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

### एसबीआयच्या सहभागाने गरजूंना ब्लॅंकेटचे वाटप

सावली तालुक्यातील गेवरा बूज, गेवरा खुर्द, रामनगर, लिंगाटोली, डोंगरगाव, मेहा, बोरमाळा, करोली आणि आकापूर या गावांमधील २३० गरजू कुटुंबांना ब्लँकेट वाटप करण्यात आले. स्टेट बँक ऑफ इंडियाचे विभागीय व्यवस्थापक श्री भरत पाटील, मुख्य व्यवस्थापक श्री रुपेश मोरे, व्यवस्थापक श्री नीरज राव आणि श्री अश्विन सर, नागपूर यांचे सहकार्य लाभले. हा उपक्रम स्टेट बँक ऑफ इंडिया, चंद्रपूरच्या विभागीय कार्यालयाच्या माध्यमातून राबवण्यात आला.





# क्रीडा महोत्सव

**सावली तालुक्यातील २७ गावांचा क्रीडामेळा!**

रामनगर गेवरा बुज येथे दिनांक ६ ते ९ डिसेंबर दरम्यान चार दिवसीय क्रीडा महोत्सवाचे भव्य आयोजन सोबत फाउंडेशन तर्फे करण्यात आले. या महोत्सवात महिला व परुष गटात- गट अ (१५ ते २५ वयोगट), गट ब (२५ वर्षांवरील) खेळाडूंचा समावेश होता. हा उपक्रम ग्रामीण भागातील क्रीडासंस्कृतीला बळ देणारा आणि सामाजिक ऐक्य वाढवणारा ठरला.

| | खेळ प्रकार | गट | एकूण सहभागी संघ |
|---|---|---|---|
| १ | कबड्डी | पुरुष गट | ३७ संघ |
| | | महिला गट | १५ संघ |
| २ | खो-खो | पुरुष गट | ३७ संघ |
| | | महिला गट | १५ संघ |
| ३ | व्हॉलीबॉल | पुरुष गट | १४ संघ |
| | | महिला गट | ० |
| ४ | ५ किमी धावणे | पुरुष गट | २७ युवकांचा सहभाग |
| ५ | २ किमी धावणे | महिला गट | १३ युवतींचा सहभाग |
| ६ | गोळाफेक | पुरुष गट | २२ स्पर्धक |
| | | महिला गट | ११ स्पर्धक |

प्रत्येक विजेत्या संघ व खेळाडूंना शिल्ड, प्रमाणपत्र आणि भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.

खेळांचे निकाल

| | खेळ प्रकार | गट | विजेता संघ |
|---|---|---|---|
| १ | कबड्डी | पुरुष गट 'अ' | निफंद्रा संघ |
| | | पुरुष गट 'ब' | विहीरगाव |
| | | महिला गट 'अ' | निफंद्रा संघ |
| | | महिला गट 'ब' | आकापूर संघ |
| २ | खो-खो | पुरुष गट 'अ' | चिचबोडी संघ |
| | | पुरुष गट 'ब' | विहीरगाव |
| | | महिला गट 'अ' | निफंद्रा संघ |
| | | महिला गट 'ब' | रामनगर संघ |
| ३ | व्हॉलीबॉल | पुरुष गट 'अ' | कोनसरी लॉयड्स संघ |
| | | पुरुष गट 'ब' | पाथरी संघ |
| ४ | ५ किमी धावणे | पुरुष गट | कु. यश राजू भांडेकर |
| ५ | २ किमी धावणे | महिला गट 'अ' | कु. शिल्पा शामराव पाल |
| | | महिला गट 'ब' | सौ. योगिता मुकेश मारभते |
| ६ | गोळाफेक | पुरुष गट 'अ' | कु. शिशुपाल दीपक लेनगुरे |
| | | पुरुष गट 'ब' | कु. कुणाल नवघडे |
| | | महिला गट 'अ' | कु. शिल्पा शामराव पाल |
| | | महिला गट 'ब' | सौ. कविता राजेंद्र गुरनुले |




# सांस्कृतिक महोत्सव

**नृत्य, उमंग आणि एकात्मतेचा जल्लोष!**

सोबत फाउंडेशन तर्फे रामनगर गेवरा बुज येथे दि. १० डिसेंबर रोजी एक दिवसीय सांस्कृतिक महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला.

या महोत्सवात सहभागींसाठी गट 'अ' (१५ ते २५ वयोगट स्त्री-पुरुष) व गट 'ब' (२५ वर्षांवरील स्त्री-पुरुष) असे दोन गट ठेवण्यात आले होते. दहा गावांनी या कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

गट 'अ' मध्ये:

- ३० एकल नृत्य व ७ समूह नृत्य सादर करण्यात आली.
- एकल नृत्य स्पर्धा विजेते:
  - प्रथम: कु. प्रांजली उंदिरवाडे (गेवरा खुर्द)
  - द्वितीय: कु. इशिता कोसमशिले (रामनगर गेवरा बुज)
- समूह नृत्य स्पर्धा विजेते:
  - प्रथम: कु. अक्षय मुनघाटे व वंश चौधरी (गेवरा खुर्द)
  - द्वितीय: कु. सानिया भोयर व ग्रुप (कसरगाव).

गट 'ब' मध्ये:

- १ एकल नृत्य व ३ समूह नृत्य सादर झाली.
- एकल नृत्य स्पर्धा विजेते:
  - प्रथम: कु. पल्लवी हुलके (गेवरा खुर्द)
- समूह नृत्य स्पर्धा विजेते:
  - प्रथम: नारीशक्ती ग्रुप (गेवरा खुर्द)
  - द्वितीय: पल्लवी हुलके व ग्रुप (गेवरा खुर्द).

हा सांस्कृतिक महोत्सव गावकऱ्यांसाठी एक आनंददायी अनुभव ठरला. सोबत फाउंडेशन तर्फे ग्रामीण भागातील युवक व महिलांना मंच मिळावा, त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.








# सामाजिक संस्थांना भेट

## जाणीव टीमला त्यांच्या वैद्यकीय सेवेबरोबरच सामाजिक सेवांशी संबंधित दृष्टीकोन विकसित करता आला

जाणीव रुग्णालयाच्या टीमने विविध सामाजिक संस्थांना दिलेल्या भेटीमुळे त्यांना अनेक महत्त्वपूर्ण बाबींची समज मिळाली. टीमला शिक्षण, मानसिक आरोग्य, वृद्धांची सेवा आणि महिलांच्या सक्षमीकरणासाठी सुरू असलेल्या उपक्रमांची प्रत्यक्ष माहिती मिळाली.

**१. शबरी सेवा समिती, कशेळे, कर्जत (दि. १६ ते 18 ऑक्टोबर २०२४):**

डॉ. सुरज म्हस्के आणि राहुल मडावी यांनी शबरी सेवा समितीला भेट दिली. या संस्थेच्या माध्यमातून गावातील मुलांसाठी राबविण्यात येणाऱ्या प्राथमिक शिक्षणाच्या कार्यक्रमाची माहिती त्यांनी घेतली. भेटीदरम्यान संस्थेचे संचालक श्री प्रमोद करंदीकर, सौ. रंजना करंदीकर, डॉ. निळकंठ फडके आणि सौ. फडके मॅडम यांच्याशी संवाद साधण्यात आला. त्यांनी नंदुरबार आणि ठाणे जिल्ह्यात महिला व मुलांसोबत चालवण्यात येणाऱ्या कामाची माहिती दिली.

**२. श्रद्धा फाउंडेशन, कर्जत (दि. २१ ऑक्टोबर २०२४):**

रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेते मानसोपचारतज्ज्ञ डॉ. भारत वाटवानी यांनी श्रद्धा फाउंडेशन ची स्थापना केली आहे. ही संस्था बेघर व मानसिक आजाराने ग्रस्त असलेल्या व्यक्तींच्या उपचार, पुनर्वसन आणि त्यांना त्यांच्या कुटुंबामध्ये पुन्हा सामावून घेण्यासाठी कार्यरत आहे.

कर्जत येथील श्रद्धा फाउंडेशनद्वारे संचालित पुनर्वसन केंद्राला डॉ. सुरज म्हस्के आणि राहुल मडावी यांनी भेट दिली.

**३. निरामय बहुद्देशीय संस्था व रामाश्रय, नागपूर (दि. २१ मार्च २०२५):**

या भेटीत डॉ. सुरज म्हस्के, डॉ. जानकी गुरपुडे आणि श्रेयस गणोरकर सहभागी झाले होते. संस्थेचे संचालक डॉ. रवींद्र क्षीरसागर आणि डॉ. उर्मिला क्षीरसागर यांच्याशी सविस्तर चर्चा झाली. ही संस्था वयोवृद्ध व्यक्तींसाठी केअर टेकिंग सेंटर चालवते तसेच गावातील महिला व मुलींसाठी कौशल्य विकासाचे कार्यक्रमही राबवते. संस्थेचे काम प्रत्यक्ष पाहण्यात आले.





# लोकबिरादरी प्रकल्प व शहीद हॉस्पिटल क्षेत्रभेट

**सदस्यांमध्ये सामाजिक आरोग्य कार्याविषयी नव्याने समज आणि बांधिलकी निर्माण झाली. विविध संस्थांच्या कामाच्या पद्धती पाहून कामाची दिशा ठरवण्यात मदत झाली.**

दिनांक: ०९ जानेवारी २०२४- जाणीव रुग्णालयाच्या टीमने हेमलकसा येथे लोकबिरादरी प्रकल्पाचे काम प्रत्यक्ष पाहण्यासाठी आणि समजून घेण्यासाठी क्षेत्रभेट केली. या भेटीदरम्यान डॉ. प्रकाश आमटे व डॉ. मंदाकिनी आमटे यांच्याशी संवाद साधला. त्यांनी 'सोबत फाउंडेशन'च्या कार्याची माहिती घेतली आणि पुढील वाटचालीस मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या.

या भेटीमुळे टीमच्या सदस्यांना ग्रामीण व आदिवासी भागातील आरोग्य, शिक्षण, आणि स्वावलंबन यावर आधारित व्यापक समाजकार्यातील अनुभव घेता आला. ही क्षेत्रभेट माहितीपूर्ण तसेच प्रेरणादायीही ठरली.

सदस्यांचे अनुभव –


विवेक राऊत:

"सामाजिक संस्थेला भेट देण्याची ही माझी पहिलीच वेळ होती. डॉ. प्रकाश आमटे यांना प्रत्यक्ष भेटून आणि त्यांच्या मार्गदर्शनाने मला खूप प्रेरणा मिळाली. हेमलकसा येथील शिक्षण, आरोग्य व युवकांसाठी सुरू असलेले उपक्रम पाहून आम्ही सर्वजण भारावून गेलो. लोकबिरादरी प्रकल्पाचा परिसर व तिथले काम अतिशय प्रेरणादायी आहे.

अश्विनी मारभते:

"डॉ. प्रकाश आमटे यांना भेटण्याची माझी खूप वर्षांची इच्छा होती – ती या भेटीतून पूर्ण झाली. समाजासाठी आपण काय करू शकतो याचे खरे उत्तर या भेटीदरम्यान मिळाले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे सामाजिक कार्याच्या दृष्टीकोनात स्पष्टता मिळाली."

दिनांक: १२ जून २०२४- डॉ. जानकी, डॉ. सुरज, श्रेयश आणि प्रणीत यांनी शहीद हॉस्पिटल, दल्ली राजारा, छत्तीसगढ येथे भेट दिली. ही भेट ग्रामीण व आदिवासी भागात आरोग्यसेवा देण्याचे काम समजुन घेण्याच्या दृष्टीने महत्वाची होती. या भेटीत शहीद हॉस्पिटलच्या डॉक्टरांशी सविस्तर चर्चा झाली. त्यांच्या अनुभवांमधून लोकसंवाद, आरोग्य न्याय, व श्रमिक समुदायासाठी कार्य करण्याच्या विविध पद्धती समजून घेता आल्या.







# ओंकार व प्रशील या तरुण स्वयंसेवकांचे प्रेरणादायी योगदान

### तुमचाही सहभाग ठरू शकतो परिवर्तनाची सुरुवात

ओंकार काटे (B.Tech. Biotechnology) हा बीड जिल्ह्यातील युवक ऑगस्ट ते ऑक्टोबर-२०२४ दरम्यान जाणीव रुग्णालयात स्वयंसेवक म्हणून कार्यरत होता. त्याचबरोबर प्रशील कांबळे (M.Sc. Agriculture) पांढरकवडा येथून जानेवारी-२०२५ मध्ये स्वयंसेवक म्हणून सहभागी झाला.

हे दोघेही ‘सर्च गडचिरोली’ संचलित ‘निर्माण’ उपक्रमातून सोबत फाउंडेशनमध्ये सहभागी झाले. या दोघांनी आरोग्य सर्वेक्षण, कार्यालयीन दस्तऐवजीकरण, तसेच माहितीचे विश्लेषण अशा विविध जबाबदाऱ्या उत्कृष्टरीत्या पार पाडल्या. त्यांच्या कामामुळे आरोग्यविषयक उपक्रम अधिक प्रभावीपणे राबवता आले.

सोबत फाउंडेशनच्या सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी तुम्हालाही संधी आहे. तुमचा वेळ, अनुभव आणि मदतीचा उपयोग ग्रामीण व आदिवासी भागातील आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रात सकारात्मक बदल घडवण्यासाठी केला जाईल. अधिक माहितीसाठी आजच संपर्क साधा.





# संस्थेस प्राप्त निधी व मदतीचा आढावा-

**जाणीव रुग्णालयाच्या कामात सातत्य, परिणामकारकता आणि व्याप्ती वाढविण्यासाठी समाजातील अनेक उदार दात्यांनी आपले योगदान दिले.**

संस्थेला जान २०२४-मार्च २०२५ या कालावधीत एकूण ₹१३,८४,४६४ (तेरा लाख चौऱ्यांशी हजार चारशे चौसष्ट रुपये) देणगी स्वरूपात प्राप्त झाले. देणगी व देणगीदारांची माहिती खालीलप्रमाणे

| रोख स्वरूपातील देणगी | | | |
|---|---|---|---|
| | देणगीदार | शहर | रक्कम (₹) |
| १ | अक्षय राऊत | | २० |
| २ | दुष्यंत | | २१ |
| ३ | विजय कवचट | | ५० |
| ४ | मिलनराम | | १०० |
| ५ | निमेश | | १०० |
| ६ | प्रभाकर आभारे | सावली | १०० |
| ७ | प्रफुल्ल | | १०० |
| ८ | साक्षी | | १०० |
| ९ | किसन ठाकरे | सावली | १०० |
| १० | राकेश आत्राम | सावली | १०० |
| ११ | विशाल निकेसर | सावली | १०० |
| १२ | ममता गंडाटे | सावली | १०० |
| १३ | आशा हुलके | सावली | १०० |
| १४ | नीता बयाळ | सावली | १०० |
| १५ | कैलास कोसमशिले | सावली | १०० |
| | | | पुढे |

| रोख स्वरूपातील देणगी | | | |
|---|---|---|---|
| | देणगीदार | शहर | रक्कम (₹) |
| १६ | कृष्णा लोणबले | | १०० |
| १७ | रुचिता मंगर | सावली | १०० |
| १८ | ताराबाई अलबनकर | सावली | १०० |
| १९ | लिलाधर मांदाळे | चंद्रपूर | १०० |
| २० | रिक्त | | १०० |
| २१ | अस्मिता श्रीरामे | सावली | १०० |
| २२ | अंकिता मेश्राम | सावली | १०० |
| २३ | शामलाल निकेसर | सावली | १०० |
| २४ | भूमिका कुंभारे | सावली | १०० |
| २५ | खुशाल निकुरे | सावली | १०० |
| २६ | नेताजी भासारकर | सावली | १०० |
| २७ | विपीन चिमूरकर | सावली | १०० |
| २८ | दुर्गा घुबडे | | १०० |
| २९ | सुधाकर वाढनकर | सावली | १०० |
| ३० | वेदिका दडमल | सावली | १०० |
| ३१ | प्रीती हुलके | सावली | १०० |
| ३२ | श्रेया मुंडारे | सावली | १०० |
| ३३ | दिव्यांशी दडमल | सावली | १०० |
| ३४ | गोकुळ आगरे | सावली | १०० |
| ३५ | जयंत गायकवाड | सावली | १०० |
| | | | पुढे |




## संस्थेस प्राप्त निधी व मदतीचा आढावा-

| रोख स्वरूपातील देणगी | | | |
|---|---|---|---|
| | देणगीदार | शहर | रक्कम (₹) |
| ३६ | कृष्णा मुनघाटे | सावली | १०० |
| ३७ | गोविंदा भोयर | सावली | १०० |
| ३८ | जयतुरा वाघधरे | सावली | १०० |
| ३९ | इशिका चौधरी | सावली | १०० |
| ४० | रुद्र निकेसर | सावली | १०० |
| ४१ | वसंत म्हस्के | सावली | १०० |
| ४२ | प्रभाकर गेडाम | सावली | १०० |
| ४३ | मयुरी खुशाल नरडे | सावली | १०० |
| ४४ | वंदना चौधरी | सावली | १०० |
| ४५ | शामराव मोटघरे | सावली | १०० |
| ४६ | कांता बोबाटे | सावली | १०० |
| ४७ | वामन बाबनवाडे | सावली | १०० |
| ४८ | आकांशा | सावली | १०० |
| ४९ | विपूल जांभुळे | सावली | १०० |
| ५० | सौरभ मुंडारे | सावली | १०० |
| ५१ | मानवी श्रीरामे | सावली | १०० |
| ५२ | शकुंतला मेश्राम | सावली | १०० |
| ५३ | उन्नती सहारे | सावली | १०० |
| ५४ | मधुकर हुलके | सावली | १०० |
| ५५ | मुखरु वाकडे | सावली | १०० |
| ५६ | नामदेव नखाते | सावली | १०० |
| | | | पुढे |

| रोख स्वरूपातील देणगी | | | |
|---|---|---|---|
| | देणगीदार | शहर | रक्कम (₹) |
| ५७ | नामदेव कोटगळे | सावली | १०० |
| ५८ | वनिता करकाडे | सावली | १०० |
| ५९ | चंदा सहारे | सावली | १०० |
| ६० | शुभम शहा | सावली | १०० |
| ६१ | कुंदन जनबंधू | सावली | १०० |
| ६२ | मोनी भोयर | सावली | १०० |
| ६३ | सुशीला काळबांडे | सावली | १०० |
| ६४ | प्रथम घोडमारे | सावली | १०० |
| ६५ | तुकाराम जराते | सावली | १०० |
| ६६ | ग्रिया मुरतेली | सावली | १०० |
| ६७ | धनराज गायकवाड | सावली | १०० |
| ६८ | शैलेश खरकाडे | सावली | १०० |
| ६९ | संजीवनी भोयर | सावली | १०० |
| ७० | मेघा नवघडे | सावली | १०० |
| ७१ | प्रतीक्षा बोबाटे | सावली | १०० |
| ७२ | केशव जनबंधू | सावली | १०० |
| ७३ | आराध्या रामगिरीवार | सावली | १०० |
| ७४ | आयांश मेश्राम | सावली | १०० |
| ७५ | प्रशांत वाकडे | सावली | १०० |
| ७६ | महेश मुरतेली | सावली | १०० |
| ७७ | मनोहर चर्लीरवार | सावली | १०० |
| | | | पुढे |




# संस्थेस प्राप्त निधी व मदतीचा आढावा-

| रोख स्वरूपातील देणगी | | | |
|---|---|---|---|
| | देणगीदार | शहर | रक्कम (₹) |
| ७८ | सविता मेश्राम | सावली | १०० |
| ७९ | होनाजी मंगर | सावली | १०० |
| ८० | सोनाजी बोरकुटे | सावली | १०० |
| ८१ | गुरुदेव आवारी | सावली | १०० |
| ८२ | ममत धारणे | सावली | १०० |
| ८३ | मोरेश्वर गायकवाड | सावली | १०० |
| ८४ | आदित्य खोब्रागडे | सावली | १०० |
| ८५ | उर्मिला नन्नावरे | सावली | १०० |
| ८६ | प्रिती जिवतोडे | सावली | १०० |
| ८७ | सविता कोलते | सावली | १०० |
| ८८ | गीता सेलोकर | सावली | १०० |
| ८९ | पुर्वज दांडेकर | सावली | १०० |
| ९० | वैशाली चौके | सावली | १०० |
| ९१ | कृष्णा कोरडे | सावली | १०० |
| ९२ | बाली उंदीरवाडे | सावली | १०० |
| ९३ | अंजना लोहंबरे | सावली | १०० |
| ९४ | इंदिरा कांबळे | सावली | १०० |
| ९५ | गोविंदा आवरे | सावली | १०० |
| ९६ | सखाराम जनबंधू | सावली | १०० |
| ९७ | मानवी श्रीरामे | सावली | १०० |
| ९८ | अश्विनी लाटकर | सावली | १०० |
| | | | पुढे |

| रोख स्वरूपातील देणगी | | | |
|---|---|---|---|
| | देणगीदार | शहर | रक्कम (₹) |
| ९९ | प्रीती वाघधरे | सावली | १०० |
| १०० | मुरलीधर वाघधरे | सावली | १०० |
| १०१ | कैलास वाढनकर | सावली | १०० |
| १०२ | तानाबाई आवारी | सावली | १०० |
| १०३ | लोकेश शेरकी | सावली | २०० |
| १०४ | विक्की दुधे | सावली | २०० |
| १०५ | भार्गव चव्हाण | | २०० |
| १०६ | ऋतुजा पाटील | | २०० |
| १०७ | राहुल | सावली | २०० |
| १०८ | गौरव चन्नावार | | २०१ |
| १०९ | प्रदीप मेश्राम | यवतमाळ | २०१ |
| ११० | जनार्धन | | २९६ |
| १११ | सुनील | | ४०० |
| ११२ | प्रेम | | ५०० |
| ११३ | साक्षी मोहरले | | ५०० |
| ११४ | देवेंद्र | | ५०० |
| ११५ | विजय नाथे | अकोला | ५०० |
| ११६ | आकाश गुजर | अमरावती | ५०० |
| ११७ | रितेश बेलसरे | अमरावती | ५०० |
| ११८ | शरयू | | ५०० |
| ११९ | दिनेश | | ५०० |
| | | | पुढे |



## संस्थेस प्राप्त निधी व मदतीचा आढावा-

| रोख स्वरूपातील देणगी | | | |
|---|---|---|---|
| | देणगीदार | शहर | रक्कम (₹) |
| १२० | रोहित | | ५०० |
| १२१ | सुप्रिया | | ५०० |
| १२२ | वृषाली | | ५०० |
| १२३ | राकेश चौधरी | चंद्रपूर | ५०० |
| १२४ | धम्मा गडपाल | गोंदिया | ५०० |
| १२५ | वासुदेव नन्नावरे | चंद्रपूर | ५०० |
| १२६ | सायरा | | ५०० |
| १२७ | अनिरुद्ध चंद्रकांत अगरकाटे | चंद्रपूर | ५०० |
| १२८ | वैभव | | ५०० |
| १२९ | सुनील मुकुंदा निकूरे | चंद्रपूर | ५०० |
| १३० | नमित संगिडवार | | ५०० |
| १३१ | पवन गुल्हाने | अमरावती | ५०१ |
| १३२ | सुचिता मलोडे | चंद्रपूर | ५०१ |
| १३३ | दामोधर | | ५५१ |
| १३४ | गौरव | | ५५५ |
| १३५ | राजू दादाजी राऊत | चंद्रपूर | ७०१ |
| १३६ | योगेश | | ७११ |
| १३७ | प्रियंका पकाला | | १,००० |
| १३८ | अमृता सुतार | गोंदिया | १,००० |
| १३९ | स्वानंद खानापूरकर | नागपूर | १,००० |
| १४० | अनिकेत भोईर | | १००० |
| | | | पुढे |

| रोख स्वरूपातील देणगी | | | |
|---|---|---|---|
| | देणगीदार | शहर | रक्कम (₹) |
| १४१ | भावेश कुमार | | १,००० |
| १४२ | तिर्था बोरसे | | १,००० |
| १४३ | राजेंद्र गजभिये | चंद्रपूर | १,००० |
| १४४ | अंकिता वाडीभस्मे | भंडारा | १,००० |
| १४५ | रितू दमहे | भंडारा | १,००० |
| १४६ | आशुतोष | | १,००० |
| १४७ | सागर बोबडे | | १,००० |
| १४८ | विवेक बोराडे | | १,००० |
| १४९ | सानिया शेख | | १,००० |
| १५० | यतीन रोडे | नागपूर | १,००० |
| १५१ | अथर्व मोहरले | ठाणे | १,००० |
| १५२ | प्रथमेश धडसे | गडचिरोली | १,००० |
| १५३ | वैभव सोनार | अमरावती | १,००० |
| १५४ | डॉ. नितेश संचेती | गडचिरोली | १,००० |
| १५५ | समीर ढोबळे | नागपूर | १,००० |
| १५६ | सरिता मानकर | वर्धा | १,००० |
| १५७ | योगिता गुरनुले | चंद्रपूर | १,००० |
| १५८ | संदीप खुडे | हिंगोली | १,००० |
| १५९ | प्राची रवींद्र सावंत | पिंपरी पुणे | १,००० |
| १६० | शुभांगी रामटेके | चंद्रपूर | १,००० |
| १६१ | परेश | | १,००० |
| | | | पुढे |




# संस्थेस प्राप्त निधी व मदतीचा आढावा-

| रोख स्वरूपातील देणगी | | | |
|---|---|---|---|
| | देणगीदार | शहर | रक्कम (₹) |
| १६२ | अभिषेक दहेलकर | चंद्रपूर | १,००० |
| १६३ | विजय | | १,००० |
| १६४ | आकाश कोल्हे | | १,००० |
| १६५ | अर्चना | | १,००१ |
| १६६ | प्रदीप कुंभारे | | १,१०० |
| १६७ | गोविंदा चौधरी | | १,८०० |
| १६८ | आशुतोष | | २,००० |
| १६९ | प्रथमेश धडसे | गडचिरोली | २,००० |
| १७० | अदिती पिदूरकर | चंद्रपूर | २,००० |
| १७१ | किशोर पाटील | | २,००० |
| १७२ | प्रतीक वडमारे | हैद्राबाद | २,००० |
| १७३ | सुरज करवाडे | नागपूर | २,००० |
| १७४ | रामप्रसाद | | २,००० |
| १७५ | अमनराज बैस | अमरावती | २,००० |
| १७६ | गजानन वैद्य | बीड | २,००० |
| १७७ | रुपेश धुले | यवतमाळ | २,००० |
| १७८ | प्राची पित्तलवार | चंद्रपूर | २,००० |
| १७९ | आशुतोष खोब्रागडे | चंद्रपूर | २,००० |
| १८० | वर्षा हंसराज रामटेके | चंद्रपूर | २,००० |
| १८१ | उज्वला वेलादी | गडचिरोली | २,००० |
| १८२ | वैष्णव | | २,००० |
| | | | पुढे |

| रोख स्वरूपातील देणगी | | | |
|---|---|---|---|
| | देणगीदार | शहर | रक्कम (₹) |
| १८३ | आकाश म्हस्के | गडचिरोली | २,००० |
| १८४ | शुभम अवघते | अकोला | २,००० |
| १८५ | वीणा दुर्वे | | २,००१ |
| १८६ | सुमेध निमगडे | चंद्रपूर | २,००१ |
| १८७ | संकेत तांबारे | उस्मानाबाद | ३,००० |
| १८८ | निरंजन तोडरमल | अहिल्यानगर | ३,००० |
| १८९ | दिग्विजय पाटील | | ४,००० |
| १९० | प्रफुल्ल शशिकांत | पुणे | ५,००० |
| १९१ | अभिजीत | | ५,००० |
| १९२ | प्रतीक नाईक | | ५,००० |
| १९३ | केवलराम कृष्णाजी नखाते | नागपूर | ५,००० |
| १९४ | सचिन बारब्दे | अकोला | ५,००० |
| १९५ | सुबोध गुप्ता | वर्धा | ५,००० |
| १९६ | नीलकंठ फडके | रायगड | ५,००० |
| १९७ | दक्षा दिवान | मुंबई | ५,००० |
| १९८ | आदित्य काकडे | चंद्रपूर | ५,००० |
| १९९ | हेमंत सांदभोर | पुणे | ५,००० |
| २०० | अक्षय आंजकर | यवतमाळ | ५,००१ |
| २०१ | मयूर पोडे | चंद्रपूर | ५,५०० |
| २०२ | अक्षय चव्हाण | यवतमाळ | ७,००० |
| २०३ | ऋषिकेश खुमकर | | १०,००० |
| | | | पुढे |




## संस्थेस प्राप्त निधी व मदतीचा आढावा-

| | रोख स्वरूपातील देणगी | | |
|---|---|---|---|
| | देणगीदार | शहर | रक्कम (₹) |
| २०४ | प्रतिभा गोळे | मुंबई | १०,००० |
| २०५ | कविता कुलदीप कामत | मुंबई | १०,००० |
| २०६ | भालचंद्र कानिटकर | मुंबई | १०,००० |
| २०७ | प्रकाश जयराम, विम्मी प्रकाश जयराम | मुंबई | १०,००१ |
| २०८ | ओंकार प्रदीप देशपांडे | पुणे | १५,००० |
| २०९ | प्रतीक निकम | मुंबई | १७,०५० |
| २१० | प्रियांका कैलास थोरात | नाशिक | २०,००० |
| २११ | प्रसन्ना तुपे | हैद्राबाद | २०,००० |
| २१२ | संजय अनंत जोशी | मुंबई | २०,००० |
| २१३ | प्रियदर्शी के. मश्रुवाला | अकोला | ३०,००० |
| २१४ | राजेंद्र म्हस्के | चंद्रपूर | ५५,००० |
| २१५ | अभिजित अशोक जोगळेकर | मुंबई | ७५,००० |
| २१६ | शबरी सेवा समिती | रायगड | १,५९,८०० |
| २१७ | विद्यागौरी अनंत खरे | नागपूर | २,००,००० |
| २१८ | भालचंद्र रघूनाथ गोखले | मुंबई | २,५०,१०० |
| २१९ | रोटरी पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट ऑफ बॉम्बे एअरपोर्ट | मुंबई | ३,००,००० |
| | एकूण | | १३,८४,४६४ |

डॉ. सुरज म्हस्के यांना मार्च २०२१ ते फेब्रुवारी २०२५ या काळात ‘निर्माण सर्च’ गडचिरोलीकडून ‘कर के देखो’ फेलोशिप मिळाली.

या फेलोशिपची रक्कम दरमहा तीस हजार रुपये होती. ही आर्थिक मदत डॉ. सुरज म्हस्के यांना ग्रामीण आरोग्यसेवा आणि सामाजिक आरोग्य विषयक कामासाठी उपयोगी ठरली. ‘सर्च’ संस्थेने जाणीव रुग्णालयाच्या कार्यात सुरुवातीपासूनच प्रोत्साहन व पाठबळ दिले आहे.






# संस्थेस प्राप्त निधी व मदतीचा आढावा-

**सहकार्यानेच परिवर्तन शक्य आहे.**

केवळ आर्थिक मदतीपुरते मर्यादित न राहता, दात्यांनी संस्थेला वस्तू स्वरूपात देखील अमूल्य मदत केली आहे. त्याची माहिती खालीलप्रमाणे.

| वस्तू स्वरूपातील देणगी | | |
|---|---|---|
| | देणगीदार | देणगी |
| १ | श्री रिंकू सिंग, रोटरी क्लब नागपूर | गादी (१०), उशी खोळ (१०), बेडशीट(१०) |
| २ | सर्च संस्था, गडचिरोली | सलाईन स्टॅन्ड (५), ऑक्सिजन कॉन्सट्रेटर (१), ऑक्सिजन सिलिंडर (३), ट्रॉली (३) |
| ३ | सौ. चैताली राऊळवार, नागपूर | बेडशीट (१०), उशी खोळ (१०) |
| ४ | डॉ. प्रशांत कारेकर, गडचिरोली | डेजर्ट कुलर (२) |
| ५ | युमेत्ता फाउंडेशन | ऑक्सिजन कॉन्सट्रेटर (१), पल्स ऑक्सिमीटर (१०) |
| ६ | डॉ. मुंदडा मॅडम | स्टूल (५), स्टील ताट (१०), ब्लँकेट (१०), प्लास्टिक पिंप (२) |
| ७ | डॉ. कवीश सांगोळे | कपाट (१), प्लास्टिक खुर्ची (५) |
| ८ | निरामय सेवा संस्था, नागपूर | लाकडी फर्निचर(टेबल (३), खुर्ची (२), पलंग(१)), सलाईन स्टॅन्ड (४), लोखंडी पेटी(४), व्हील चेअर(३), स्ट्रेचर(१), पाळणा(२) |

सर्व देणगीदारांचे मन:पूर्वक आभार. तुमच्या मोलाच्या सहकार्यामुळेच 'सोबत फाउंडेशन'ची वाटचाल अधिक प्रभावीपणे आणि दृढतेने सुरू आहे.



# जाणीव रुग्णालय – एक सामाजिक आरोग्य चळवळ

**ग्रामीण भागातील रुग्णांना दर्जेदार आरोग्यसेवा मिळावी यासाठी सातत्याने प्रयत्नशील.**


**पत्ता**

जाणीव रुग्णालय
(सोबत फाउंडेशन चंद्रपुर),
मु. पो. गेवरा बूज,
ता. सावली, जिल्हा चंद्रपुर,
महाराष्ट्र-४४१२१५

**आम्हाला ऑनलाईन फॉलो करा.**

📘 Facebook

📷 Instagram

**संपर्क**

- डॉ. सुरज म्हस्के- 📱 +91 9420190844
- डॉ. जानकी गुरपुडे- 📱 +91 8788010417
- डॉ. रोहित गणोरकर- 📱 +91 9011758584


**आर्थिक मदतीतून साथ द्या**

तुमच्या थोड्याशा आर्थिक मदतीतूनही मोठा बदल घडू शकतो. खाली दिलेल्या युपीआय आयडी आणि खाते क्रमांकावर तुम्ही आर्थिक मदत करू शकता.

Sobat Foundation, Chandrapur
UPI ID- 9420190844@SBI
Bank Name: SBI Mudza Sab.
Account No: 40862269338
IFSC Code: SBIN0009431

SCAN & PAY